# समर्थन

नोंदणी क्रमांक : पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र. एफ -१८९०३ (मुंबई), सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई १५६७/९६ जीबीबीएसडी
११५, धुरी कमर्शियल प्लाझा, वसई रोड रेल्वे स्टेशनजवळ, वसई (पू), जि. पालघर -४०१२०७
दूरध्वनी:०२५०-२३९०१०३/२३९०१०४. www.samarthanadvocacy.org

**अध्यक्ष : प्रविण महाजन** **उपाध्यक्ष: आशिष कुलकर्णी** **कार्याध्यक्ष : संतोष पाटील**

दिनांक १४ जून २०१७

**कृपया प्रसिद्धीसाठी**

प्रति,
**मान. संपादक/मुख्य वार्ताहर**

## विषय: मानवी हक्क वार्ता पुरस्कारासाठी अर्ज मागविणेबाबत

मान. महोदय,

'समर्थन' ही संस्था मागील २२ वर्ष राज्याच्या अर्थसंकल्पाचा अभ्यास करीत आलेली आहे. सदर अभ्यासामागे राज्याच्या धोरणांचा खराखुरा अन्वयार्थ विधिमंडळ, माध्यमं आणि बुद्धिवाद्यांपर्यंत पोहोचावा आणि राज्याचा अर्थसंकल्प साध्या व सोप्या भाषेत जनतेपर्यंत जावा हा उद्देश आहे. धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणून 'समर्थन' आजपर्यंत काम करीत आलेली आहे.

याच कामाचा एक भाग म्हणून समर्थन, मानवी हक्कांसाठी विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पत्रकारांना 'मानवी हक्क वार्ता पुरस्कार' देऊन सन्मानित करीत आलेली आहे. वर्ष २०१६-१७ हे पत्रकारांना पुरस्कार देण्याचे एकविसावे वर्ष आहे. आजपर्यंत शंभरहून अधिक पत्रकारांना या पुरस्काराने सन्मानित केले आहे.

'मानवी हक्क वार्ता पुरस्कार २०१६' साठी अर्ज मागवित आहोत. समर्थन व अभिव्यक्ती समर्थन पत्रकार संघटनेशी संलग्न पत्रकारांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. या पत्राद्वारे आम्ही आपणास विनंती करतो की, आपल्या विभागात मानवी हक्काला घेऊन पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांचे अर्ज समर्थन कार्यालयामध्ये पाठविण्यास सहकार्य करावे. आपण आपल्या वर्तमानपत्रातून सदर बातमीस प्रसिद्धी द्यावी. सदर अर्ज दिनांक **१५ जुलै २०१७** पर्यंत पाठवण्यात यावेत ही विनंती.

आपला,
विवेकपंडित
**विवेक पंडित**
संस्थापक सदस्य,समर्थन

E-mail : samarthanmumbai97@gmail.com